# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. २५ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : २७/१२/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२७/१२/२०१९ शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री. खडके सुनिल वामनराव | सौ.देशमुख प्रतिभा गजानन |
| श्री. कोल्हे प्रविण रामदास | सौ.काळे रेश्मा कुंदन |
| श्री. सनकत चेतन गणेश | श्री.भंगाळे विष्णू रामदास |
| श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | श्री.बरडे नितीन मनोहर |
| श्री. पाटील राजेंद्र झिपरु | शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस , श्री.उत्कर्ष गुटे, उपायुक्त. श्री. मिनीनाथ दंडवते, उपायुक्त, मुख्यलेखाधिकारी, कपील पवार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली**

**नगरसचिव :-** जळगांव महानगरपालिका सभागृह नेता यांचेकडेस कार्यरत असलेले श्री.राजेंद्र अरूण मराठे यांचे नुकतेच अचानक निधन झालेले आहे. मा.सभापती महोदया यांच्या निर्देशानुसार त्यांना आपण सर्वांनी उभे राहुन श्रध्दांजली द्यावी.

**नगरसचिव :-** सन्मा.सदस्य श्री.दिलीप बबनराव पोकळे यांचा रजेचा अर्ज आलेला असुन मा.सभापती महोदया यांनी मंजुर केलेला आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १.** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील डांबरी रस्ते दुरुस्ती करीता होणारा खर्च सर्व साधारण रस्ता अनुदान अंतर्गत करण्यात आलेला असून सदर कामाचे लेखाशिर्ष बदलास कार्योत्तर मंजुरी मिळण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. चेतन सनकत :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन बरडे :-** प्रभाग क्रं. १२ मधील रस्ते दुरूस्तीचे मी यादी मागतोय , मला अजुनपर्यंत यादी मिळत नाहीये

**श्री. सोनगिरे , शाखा अभियंता :-** महापौर सो यांचे आदेशानुसार प्रभागातील रस्ते दुरूस्ती करीता स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करून , निविदा काढुन , मंजुरी घेवुन , कार्यादेश दिलेले आहेत त्यानुसार काम चालु आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मी काय म्हणतोय माझ्या प्रभागातील कोणते रस्ते घेतलेले आहे त्यांची यादी पाहीजे आहे मला .

**मा.सभापती :-** आपल्याला यादी द्यायला काय अडचण आहे ?

**श्री. सोनगिरे , शाखा अभियंता :-** संबंधित प्रभागातील इंजिनियर कडे संपुर्ण प्रभागातील इस्टीमेट तयार करतांना रस्ते नुसार ईस्टीमेट तयार केलेले आहे .

**श्री.नितीन बरडे :-** उपायुक्त साहेब मला एक समजत नाहीये , तिन सभेआधी मला शब्द दिला होता की तुमच्याकडे तुमच्या प्रभागाची यादी पोहोचवतो .

**श्री. सोनगिरे , शाखा अभियंता :-** संबंधित प्रभागातील इंजिनियर ला सांगुन मी आज तुम्हाला यादी पोहोचवतो.

**श्री.नितीन बरडे :-** आजची तिसरी सभा झाली म्हणजे महिना उलटुन गेला आहे. दोन अधिकारी आहेत माझ्याकडे एक .

**श्री. सोनगिरे , शाखा अभियंता :-** बरोबर आहे भाऊ अमृतकर साहेबांकडे आहे हा विषय व त्यांनी ते केले होते .मी ती यादी आज तुम्हाला देतो .

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब याच्यावर आपला किती खर्च झालेला आहे आता पर्यंत रस्ते दुरुस्तींवर, दोन सव्वादोन कोटी खर्च झाला आहे. तरी ही जळगांव शहराचा रस्ता चांगला दिसत आहे का ?

**श्री. सोनगिरे , शाखा अभियंता :-** खड्डे बुजविले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** खड्डे म्हणत आहे खड्डे तरी चांगले दिसत आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदया, प्रत्येक प्रभागामध्ये कोण कोणते खड्डे आपण बुजविले किंवा दुरुस्त केले या बाबतीचा अहवाल आम्हाला हवा आहे. नितीन भाऊ मागच्या दोन ते तिन मिटींग पासुन त्याच्या प्रभागातले कोण कोणत्या भागात खड्डे बुजविणार आहात. तुम्ही इस्टीमेट करणार आहे खड्डे बुजविणार आहे ती गोष्ट वेगळी, पण आता पर्यंत कोण कोणते खड्डे बुजविले आहे.

**श्री. सोनगिरे , शाखा अभियंता :-** ज्या ज्या प्रभागातले नागरीकांनी संमती दिलेली आहे ते घेतले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** दर मिटींगला हाच शब्द आहे. मी कोणते रस्ते घेतलेले आहे तिच विचारणा करत आहे फक्त.

**मा.सभापती :-** ते दोन तीन मिटींग पासुन मागणी करत आहे की, कोणते रस्ते घेतलेले आहे त्यांच्या प्रभागात त्यांना कळवायला हव. साधी सरळ मागणी आहे त्यांची. आणि का मागणी आहे त्यांची त्याचा उद्देश लक्षात घ्या. जेव्हा हे प्रशासकीय कामे होत आहे. नगरसेवकांशी संवाद असला पाहिजे. नगरसेवकांना याबाबतची माहिती असली पाहिजे. म्हणजे आमच्या प्रभागात म.न.पा.मार्फत काही तरी दुरुस्ती होत आहे. सुधारणा होत आहे. नगरसेवकांना जर माहिती नसतील तर आम्ही नागरीकांना काय सांगायच. आम्हाला नागरीकांकडुन फोन येतात की, येथे गाडी आलेली आहे, येथे काम सुरु करत आहे. तो रस्ता करायला नाही म्हणता. नगरसेवकांना आपण का सांगत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** आम्हाला सांगायची गरज नाही का ? रस्ते कश्या प्रकारे घेतलेले आहे. काम कश्या प्रकारे होतो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, कामाची रुपरेषा काय आहे, किती वेळा काम होतो किती खडी वापरली जाते. आणि सकाळी दोन तीन खड्डे बुजल्यानंतर सांगतात की, आमच काम इतपर्यंत होत, उद्या बघु आणि उद्या येत नाही. गांधी नगरचा सुध्दा झालेल आहे. काम चांगल झाल तर आम्ही म्हणु ना, आता भोळे साहेबांनी ते ऑर्कीड हॉस्पीटलच्या समोरचा तो क्ल्व्हर्ट लावलेला आहे आम्ही अभिनंदन करतो ना, नागरीकांचे हाल होत होते, तो क्ल्व्हर्ट सुरु झालेला आहे. अक्षरश: आर्ध्या रोडावरं ज्या फरश्या टाकल्या होत्या त्याच्यावरुन कोणी जात नव्हत. म्हणजे ६ फुटाच्या रस्त्यावरुन जाण येण चालु होत. जी गरज आहे आम्ही सभागृहाला सांगत आहोत. त्या माध्यमातुन होत असल तर ते ही आम्ही अभिनंदन करु.

**श्री.नितीन बरडे :-** प्रशासनामार्फत होत आहे. ते ही काम चांगल व्हाव, कोणाची जबाबदारी आहे अभियंत्यांची जबाबदारी आहे. आज चर्च रोडला गोदावरी चक्की जवळ रोडाच्या मध्यभागी खड्डा पडुन गेलेला आहे क्ल्व्हर्टला, मी आयुक्त साहेब दि.२५/०७/२०१९ रोजी एक अर्ज दिलेला आहे. अभियंत्याच्या केलेल्या कामांची मी मागणी केलेली आहे. आज बिलांची मागणी केलेली आहे अमृतकरांच्या, त्यांच्या प्रभागात त्यांच्या अंडर येतात ते काम त्यांनी कसे केलेले आहे. याच मला आयुक्त साहेबांनी शब्द दिलेला होता तुम्ही तक्रार करा मी कार्यवाही करेल. ही कार्यवाही लपविण्यासाठी तुम्ही त्यांची बदली ऑर्डर काढली का ? परवा बदली झालेली आहे त्यांची, हे अर्ज दिलेला आहे मी, कोणाच्या सांगण्या वरुन बदली केली. मिलींद जगताप, हे स्टेट बँक कॉलनी रस्त्यावर जाऊन या, कॉंक्रीटचा रस्ता झाला आहे दोन वर्षापुर्वी, त्या रस्त्यावर खड्डे पडलेले आहे, एक दिवस मिलींद जगताप त्या रस्त्यावर आलेले नाही. खोटे बिल नोंदविण्यासाठी मिलींद जगतापांना तेथे हजर केलेले आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, जर अमृतकर यांची बदली झाली असेल तर मला अस वाटत आहे की, प्रभाग क्र.५ ला त्यांना देण्यात आलेल आहे असे आहे का ?

**श्री. सोनगिरे , शाखा अभियंता :-** प्रभाग क्र. ४ व ५ ला.

**श्री.विष्णु भंगाळे :-** किती दिवस झाले दिलेल आहे त्यांना, नितीन भाऊंनी विचारलेल आहे बदली का केली एक, परंतु कमीतकमी आम्ही नगरसेवकांना त्याची माहिती दिली का ?

**श्री.नितीन बरडे :-** बदली का केली ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** आम्ही फोन कोणाला करायचा, काही ही झाल की, आम्ही काय करतो भोळे साहेब पाणी पुरवठ्याच काही झाल की, खडके साहेब. म्हणजे खालचे अधिकारी आम्हाला किती वेळा बदली करुन मिळतील, कसे मिळतील त्याचीच आम्हाला माहिती राहात नाही.

**श्री.नितीन बरडे :-** आम्ही कामाची गुणवत्ता मागतो, आजही जाऊन पाहुन घ्या त्याच्या युनिट मध्ये, काही ठिकाणी गटारी चालु आहे त्याला पि.सी.सी. चालु आहे का ? कश्या प्रकारे ती गटारी चालु आहे. त्यांची बदली रद्द करण्यात यावी. आणि ते जगताप साहेब बिलकुल कामांवर जात नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** जावळे साहेबांची बदली का केली याच ही कारण असेल ना ?

**श्री.सुनिल खडके :-** दोघीच्या दोघी बोलत आहे, आम्हाला कळत नाही काय आहे.

**श्री.नितीन बरडे :-** म्हणजे मी अर्ज दिलेला आहे कामाची चौकशी करायची आहे बिले मागितलेले आहे मी, मी बदली नाही मागितली त्यांची.

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** पहिला विषय जो आपण म्हटल आहे, सन २०१७ ते आजपावेतो रस्ते, गटारी, चेनलिंग फेन्सींग करणे व किती काम झालेले आहे याची सविस्तर माहिती मिळावी , याची सविस्तर माहिती मी तुम्हाला सोमवारी उपलब्ध करून देतो .

**श्री.नितीन बरडे :-** तुम्ही नाही दिली तरी माझ्याकडे आहे. पण मला तुमच्याकडुन ऑफिशियली पाहिजे होती.

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** सोमवारी ऑफिशियली माहिती देतो.

**श्री.नितीन बरडे :-** पण बदली कशी झाली त्यांची.

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** बदलीचा निश्चित विषय काय आहे आता नाही सांगु शकत, मी फाईल बघतो आणि तुम्हाला सांगातो.

**श्री.नितीन बरडे :-** आपआपसात बदली करुन द्या. त्यांना वाचविण्यासाठी बदली केलेली आहे.

**श्री. सोनगिरे , शाखा अभियंता :-** अस काही विषय नाही.

**श्री.नितीन बरडे :-** याच्यात सर्व साध्य होईल ना बदली का केलेली आहे कोणाच्या नातेवाईक आहे. कोणाचे लागेबांधे आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, त्यांची बदली रद्द करुन यांच्याकडेच त्यांना बदली न करता ठेवण्यात यावे.

**श्री.नितीन बरडे :-** माझ्याकडेच ठेवा त्यांना जसेचे तसे,

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** आपला जो काही वाद आहे, मिटींग संपली की, मी तुम्हाला व्यक्तीश: भेटुन सांगतो, पण फाईल पाहिल्यानंतरच सांगु शकतो.

**श्री.नितीन बरडे :-** मी सांगतो ना सर, यांनी त्यांची यांची बदली केलेली आहे संगनमताने.

**मा.सभापती :-** नगरसेवकांचे जे आरोप आहे कोणाला वाचविण्याच्या संदर्भात, अस जर असेल तर तुम्हाला सक्त सुचना आहे की, कोणालाही येथे वाचविण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये. आणि कामाची गुणवत्ता संपुर्ण शहरात मेनटेन झालीच पाहिजे. प्रशासनाला सुचना आहे की, फक्त यांनाच नाही तर इतरही नगरसेवकांना त्यांच्या प्रभागात कोणते कामे होत आहे त्याची माहिती अवगत करण्यात यावी.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील डांबरी रस्ते दुरुस्तीसाठी लागणारे इमल्शन, ट्रॅक्टर व मजुर तसेच वेगवेगळया साईजची खडी खरेदी करणेकामी “रस्ता व्यवस्था व दुरुस्ती” अंतर्गत लेखाशिर्ष अंतर्गत खर्च करण्यास मान्यता घेण्यात आलेली आहे. मनपाचे आर्थिक परिस्थितीमुळे मक्तेदाराचे देयक निधीचे उपलब्धतेनुसार खर्च करण्यात आले.

जळगांव शहर महानगरपालिकेस “रस्ता व्यवस्था व दुरुस्ती” अंतर्गत दिनांक २६/०५/२०१७ रोजी रुपये ७५ लक्ष, दि.२०/०४/२०१८ रोजी रुपये ७५ लक्ष, दि.०१/०३/२०१९ रोजी रुपये ७५ लक्ष असे एकूण रुपये २.२५ कोटी प्राप्त झालेले आहेत. परंतु शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१७/प्र.क्र.२३९/नवि-३३ मुंबई दि.११ मे २०१७ नुसार जळगांव शहरात अमृत योजनेचे काम सुरु असल्याने डांबरी रस्त्यांचे कामे हाती घेऊ नये असे नमुद असल्याने प्रस्तावित सर्व कामे रद्द करण्यात आली.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग कडील शासन परिपत्रक क्र.विपआ-२०१५/प्र.क्र.२०/नवि-२० दिनांक २९/०५/२०१८ नुसार शहरातील डंबरी रस्ते दुरुस्ती करीता सर्वसाधारण रस्ता अनुदान वापरण्यात यावे असे सुचीत केल्यामुळे जळगांव शहरातील डांबरी रस्ते दुरुस्ती करीता अनुदान वापरण्यात आले. सदर अनुदानातुन खालील प्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| इमल्शन खरेदी करीता | रुपये ५४,६१,१७०/- |
| वेगवेगळया साईजची खडी खरेदी | रुपये २७,६७,७२१/- |
| ट्रॅक्टरसह मजुर पुरविणे | रुपये ३५,४९,५१५/- |
| इमल्शन वाहतुक करणे | रुपये ३,०२,९०४/- |
| मक्तेदारांमार्फत शहरातील रस्ते दुरुस्ती करणे | रुपये १,००,८९,३६७/- |

रस्ते दुरुस्तीचे अंदाजपत्रक रस्ते व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशीर्षा अंतर्गत मंजुरी घेण्यात आले मात्र दिनांक २९/०५/२०१८ रोजीचे परिपत्रकानुसार शासनाने वितरीत केलेले सर्व साधारण रस्ता अनुदान अंतर्गत खर्च करण्यात आला अशा फेरबदलास कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच रस्ता अनुदान हे मनपा खजिन्यात शिल्लक नसल्याने पुढील खर्च रस्ते व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यास व रस्ता अनुदान मनपास चालु आर्थिक वर्षात नव्याने प्राप्त झाल्यास उक्त कामाचा या पुढील खर्च अनुदानातुन करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :-श्री.दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०२/१२/२०१९ ते दि.०८/१२/२०१९, या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सौ. प्रतिभा देशमुख :-** अग्निशमन विभागाकडील माहिती घेतली .

**सौ. रेश्मा काळे :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०२/१२/२०१९ ते दि.०८/१२/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सौ.देशमुख प्रतिभा गजानन**

**अनुमोदक :-सौ.काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.१०१ दि.०६/१२/२०१९ अन्वये वार्ड क्र.१२ मध्ये नुतन अजिंठा सोसायटी मेहरुण स.नं.४७९/अ१ मधील ओपनस्पेसला चेनलिंग फेंन्सींग करणे कामी मक्तेदार पद्मालय कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे निविदा रकमेपेक्षा ३.०३% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१२,७६,३१२/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.१०३ दि.१०/१२/२०१९ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका मनपा प्रशासकीय इमारतीमधील डक्ट मधील ड्रेनेज पाईप लाईन नविन बसविणे कामी मक्तेदार कय्युम नवाज शेख यांचे निविदा रकमेवर ५% जास्तीचे सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.७,६८,७८७/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.१०४ दि.१०/१२/२०१९ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०८ व ०९ अंतर्गत डांबरी रस्ते दुरुस्त करणे कामी मक्तेदार शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती निविदा रकमेवर ३% जास्तीचे सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२२,७९,४७४/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- श्री.सनकत चेतन गणेश**

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**श्री. चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री. विष्णू भंगाळे :-** त्याचे स्टेटस काय आहे. आज शहरातील रस्त्यांचे कामांची निविदा निघालेली आहे .तर आपण ते कसे करणार आहोत वृत्तपत्रांमध्ये सुध्दा रस्ते दुरूस्तीला ब्रेक अश्या बातम्या येत आहेत.

**श्री. सोनगिरे , शाखा अभियंता :-** नाही तसे नाही आहे , आपल्या डिपार्टमेंट मार्फत आणि कॉन्ट्रक्टर मार्फत जे काम दिलेले होते ते कामं चालु आहेत.

**श्री. विष्णू भंगाळे :-** कोणकोणत्या भागात चालु आहे ?

**श्री. सोनगिरे , शाखा अभियंता :-** डिपार्टमेंटकडुन भाग्यलक्ष्मी ते काशीबाई पर्यंतचा रस्ता आपल्या खात्यामार्फत सुरू केलेला आहे. नेमाडे साहेबांकडे मक्तेदारामार्फतचे कामं सुरू आहे .

**श्री. विष्णू भंगाळे :-** कुठे चालु आहे आता नेमाडे साहेबांकडील कामं.

**श्री. नेमाडे , शाखा अभियंता :-** वॉर्ड नं. १३ मधील नेहरू नगरमध्ये काम सुरू आहे.

**श्री. विष्णू भंगाळे :-** शहरामध्ये किती भागात खड्डे, रस्ते बुजविलेले आहेत ? जळगांव शहरामध्ये आतापर्यंत किती खड्डे बुजविले आहे .

**श्री. सोनगिरे , शाखा अभियंता :-** आपण डिपार्टमेंटकडुन जे काम करतो ते मेन रोडावरील कामं करीत असतो.आणि बरचशे मेनरोड झालेले आहे .

**श्री. विष्णू भंगाळे :-** म्हणजे किती , मला असे म्हणायचे आहे की आपण बऱ्याच दिवसांपासुन म्हणजे पावसाळयापासुन डांबर संपलेले आहे . अजुन किती चालना मिळाली आहे. नागरीक हैराण झालेले आहेत , त्रस्त झाले आहेत .कोणत्याही भागात जा आपल्यालाच दोष दिला जातो .

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** याच्यात अमृतचा पण विषय आहे .

**श्री. विष्णू भंगाळे :-** हो ना मग अमृत योजना , अमृत योजना म्हणुन चालणार नाही तेही प्रशासनाचं कामं आहे. नंसतं हे असं म्हणुन चालत नाही. की फक्त बोलुन चालतं नाही .

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** भाऊ तुमच्या वेळेसच सुरू झाली आहे अमृत योजना तुम्ही करून घ्या .

**श्री. विष्णू भंगाळे :-** अमृत योजना आमच्या वेळेस चालु झाली आहे हे मान्य आहे . ती आमच्या वेळेला मंजुर झाली पण कामं करून घ्यायचं ते आपल्याकडे आहे ना आता

**श्री. नितीन बरडे :-** आता मागच का काढता आहे . तुमच्या याच्यात दिलं आहे आरोग्याचं त्याच सांगा.

**श्री.चेतन सनकत :-** सभापती सुचना देत आहे. एक एक करुन बोला.

**मा.सभापती :-** आपल्याला समस्या सोडवायच्या आहे की नाही.

**श्री. नितीन बरडे :-** नक्की नक्की, मग मॅडम ते असे म्हणतात तुमच्या काळात.

**मा.सभापती :-** तुमच्या केलेल्या आरोपाचे खंडन करण्यासाठी ते असे म्हणणारच आहे.आपण हा आरोप करणे सुध्दा चुकीचे आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** खड्डे तर तुम्हीच केलेले आहे आम्ही तर बुजत आहे.

**श्री. नितीन बरडे :-** साडेपाच वर्षापुर्वी मोठमोठे बोर्ड लावलेले होते. तुम्हाला कचऱ्याची चिड येत नाही का ? तुम्हाला खड्डयांची चिड येत नाही का ?

**मा.सभापती :-** अजेंडयावरचे विषय झालेले आहे. जर आपल्याला परवानगी दिली जाते बोलण्याची तर आपण त्या संधीचे गैरवापर करु नये सर्व नगरसेवकांना ही सुचना दिली जात आहे. आपण येथे चर्चा करुन मार्ग काढण्यासाठी आलेलो आहोत. आपल्याला जर एकमेकांवर फक्त आरोप करायचे असतील तर त्यासाठी आपल्याला स्वतंत्र प्रेस कॉन्फ्ररन्स घेऊन सुध्दा आरोप करता येतील. सभागृहाचा अधिकाऱ्यांचा त्यासाठी वेळ वाया घालवु नये. कृपया सगळयांनी ही सुचना लक्षात घ्यावी. विषयांतर होणार नाही. अश्या पध्दतीने थोडक्यात आपल म्हणण मांडाव.

**श्री. विष्णू भंगाळे :-** सभापती महोदया, माझा आरोपाच्या बाबतीत काही एक विषय नव्हता, मी फक्त माहिती विचारत होतो जळगांव शहराच्या खड्डयांच्या बाबतीत. आता पर्यंत आपण किती खड्डे बुजलेले आहे.

**श्री. सोनगिरे, शाखा अभियंता :-** ती माहिती मी आणलेली नाही.

**श्री. विष्णू भंगाळे :-** आपल्याला येथे हव होत ते सर्व. मिटींगच आपण कशासाठी घेतो. सभागृहात ही माहिती असण गरजेच आहे.

**श्री. सोनगिरे, शाखा अभियंता :-** ठिक आहे, सभागृहाला ही दाखुन देतो मी आणि आपल्याला ही दाखवुन देईल मी ती माहिती.

**श्री. विष्णू भंगाळे :-** सभापती महोदया, अलाहाबाद बँकेचे खाते सिलच आहे असे एक मोठे हेडींग मध्ये वृत लोकमतने दिलेल आहे. त्याच्यात आपल्या प्रशासनाने जबाबदारीने म्हटलेल आहे की, दुसरे खाते सिल झालेले आहे जे आपण जास्त वापरत नाही. सभागृहाला आणि मला ही त्याच्या बाबतची माहिती कळवावी.

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** खाते सिल नाही. त्याच्यात भुसंपादनाचे काही केसेस होत्या. त्याच्या बाबतीत काही रक्कम त्यांनी थांबविली होती. तो पण आता प्रॉब्लेम सोल्व्ह झालेला आहे.

**श्री. विष्णू भंगाळे :-** दुसर ही खात.

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** म्हणजे तो प्रॉब्लम होता पण भुसंपादनाच्या बाबतीत होता. पण त्या रक्कमा न्यायालयाच्या कामासाठी थांबविलेल्या होत्या. आता त्या बाबतीत कोणतीही समस्या नाही.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, त्या ठेकेदारावर काही दबावतंत्र आहे की नाही ? शिवाजी नगर उड्डाण पुलाचे आता ते खांब निघत नाहीत तर त्याच्यामध्ये काय करायचे आता त्याला नऊ महिने होवुन गेले आहेत . वर्कऑर्डरला फक्त शिल्लक १३ महिने राहीलेले आहेत .त्यांना विचारायला गेले तर ते एम.एस.ई . बी चे नांव सांगतात , एम.एस.ई . बी वाले सांगतात नियोजन मंडळाचे नांव नियोजन वाले सांगतात बांधकाम विभागाचे नांव सांगतात तर आम्ही शिवाजी नगरवाल्यांनी काय करायचं . वर्कऑर्डरला फक्त शिल्लक १३ महिने राहीलेले आहेत .

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** आता मॅडमांनी स्वत: त्यांच शेड्युल घेतलेले आहे . तेथील जे कार्यकारी अभियंता आहेत पाटील साहेब त्यांना आपण उद्या बोलावुन घेवु त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलुन घेवु आणि मग त्यांच्यानंतर आणि आपण मागणी करू.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** नियोजन मंडळाचा जो प्रस्ताव आहे ते प्रकरण तिथंच पडलेले आहे त्याच्यावर सगळे एकमेकांच्या अंगावर ढकलत आहेत. मी त्याची माहिती घेतली आमचा विषय झाला त्या विषयावर तरी प्रशासनाने त्याच्यावर लक्ष घालावं .

**मा.सभापती :-** जळगांव शहरातील खुप मोठया जनतेसाठी महत्वाचा विषय आहे फ्लायओव्हरचा तर आपला जो निधी आहे . कारण हा जो विषय आहे तर तो जर निधी अभावी जर रखडला असेल तर प्रशासनाने याची नोंद घ्यायची आहे. आणि तो निधी आपण ईथे अत्यावश्यक म्हणुन वापरू शकतो कसा वापरू शकतो याच्याबद्दल आपण आयुक्त साहेबां बरोबर चर्चा लवकरच करूया, आणि या विषयाचं गांभीर्य लक्षात घेवुन लवकरात लवकर मार्गी लावावा.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया , अस जर राहीलं तर ढवळाढवळीत जो १३ महिन्यांचा कालावधी राहीलेला आहे तो निघुन जाईल ,आणि मग या शिवाजी नगरवासीयांना त्रास होईल. आणि तुम्ही लवकरच निर्णय घ्यावा ही विनंती .

**मा.सभापती :-** आपण हा विषय कसा लवकरात लवकर मार्गी लावु शकतो हे सुचवावे .

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , सांडपाण्यावर प्रक्रीया होत नसल्याबाबत वृत्तपत्रामध्ये आलेले आहे, म्हणजे हा प्रकल्प आपला का स्थगीत आहे. किंवा याचं खातं गोठविण्याचं कारण काय आहे ? जो आपल्याला मनपाला निधी मिळालेला आहे त्याचा उपयोग का होत नाहीये ?

**श्री.बोरोले, प्रकल्प अभियंता :-** आपला प्रकल्प कार्यान्वीत नाहीये म्हणुन तो गोठवलेला आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** म्हणजे आपण त्याची सुरूवातच केली नाहीये का ?

**श्री.बोरोले, प्रकल्प अभियंता :-** सुरूवात झालेली आहे आता पण कार्यान्वीत नाहीये म्हणुन झालेलं आहे.

**मा.सभापती :-** प्रकल्प पुर्ण झाल्यावरचं ते सिल उघडले जाईल का ?

**श्री.बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो मॅडम

**श्री.विष्णु भंगाळे :-** प्रकल्प कधी पुर्ण होणार आहे तो ?

**श्री.बोरोले, प्रकल्प अभियंता :-** आपण २४ महिन्याची मुदत दिलेली आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता किती महिने झाले आहेत ?

**श्री.बोरोले, प्रकल्प अभियंता :-** आता ४ महिने झाले आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** चारच महिने झाले आहेत.

**श्री.बोरोले, प्रकल्प अभियंता :-** होय .

**श्री.विष्णु भंगाळे :-** पण हा निधी रिटर्न तर जाणार नाही ना ?

**श्री.बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही नाही .

**श्री.विष्णु भंगाळे :-** म्हणजे त्याचा नक्की उपयोग होईल ना ?

**श्री.बोरोले, प्रकल्प अभियंता :-** होय आपले पैसे आपल्याकडेच आहेत फक्त ते सिल आहेत.

**मा.सभापती :-** म्हणजे खाते गोठविण्याचे कारण प्रकल्प कार्यान्वयीत नाही हे आहे त्या प्रकल्पाचे काम कसे सुरू आहे समाधान कारक आहे किंवा काय .

**श्री.बोरोले, प्रकल्प अभियंता :-** होय मॅडम काम समाधानकारक सुरू आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ठिक आहे.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती महोदय , एक परवाच्या दिवशी बातमी होती वाटतं , गाळे धारकांकडुन वसुल केलेल्या पैशांमधुन प्रशासन व पदाधिकारी आमने सामने अशी काही बातमी होती काहीतरी आपण पैसे दिलेले आहेत ३४ कोटी याच्यात आता किती जणांना दिले आहेत आणि किती राहीलेले आहेत. २०१५ पासुन आपल्या कर्मचाऱ्यांचे बाकी आहेत .

**मा.सभापती :-** म्हणजे त्यांचे म्हणणे असे आहे की , किती कर्मचाऱ्यांना दिले गेलेत आणि किती बाकी आहेत .

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** हो मॅडम, आपल्याकडे एकूण ७८ कोटी रूपये देणे आहे सगळे ते कसे मी सांगतो. त्यात जिपीएफ आहे त्याचे १५ कोटी आपल्याला द्यायचे आहेत. नंतर आपली डिसीपीएस योजना आहे त्याचे आपल्याला ५ कोटी रूपये द्यायचे आहेत. अर्जित रजेचे आपण कर्मचाऱ्यांना आपण जे निवृत्ती नंतर देतो त्याचे ८.३१ कोटी द्यायचे आहेत , नंतर ग्रॅज्युएटी असते सेवा उपदान त्याचे ६ कोटी रू. द्यायचे आहेत. नंतर ग.स सोसायटी आहेत त्यांचेकडुन कर्ज घेतलेले असते त्याचे ६.३१ कोटी रू.आपल्याला द्यायचे आहेत. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची जी सोसायटी आहे त्यांचे आपल्याला २४ लाख रू. द्यायचे आहेत. कर्मचाऱ्यांची एल.आय.सी आहे त्याचे ७० लाख रू. द्यायचे आहे. आपण जे.डी.सी.सी चे कर्ज फेडण्यासाठी काही निधी घेतला होता ते ४ कोटींची एफ.डी परत आपल्याला करायची होती. असा एकूण म्हणजे हया मुख्य गोष्टी सांगीतल्या आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** याच्यामध्ये आपण तुमच्याकडे ज्या नोंदी आहेत त्याच्या क्रमानुसारच दिलेल्या आहेत का ?

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** हो , म्हणजे आपण कसे आहे उपदान हे क्रमानुसार ठेवले आहे आणि अर्जित रजेच्या रकमा चतुर्थ कर्मचाऱ्यांना प्रथम द्याव्या हा आपण प्राधान्यक्रम ठेवलेला आहे.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती मॅडम मध्यंतरी काही कर्मचारी बडतर्फ झाले होते .

**मा.सभापती :-** होय.

**श्री.नितीन बरडे :-** आपण ठराव केला होता कामावर घेण्याचा त्याच्यात श्री.सुरेश बळीराम सोनवणे हे आपले कर्मचारी होते त्यांची शासनाकडुन ऑर्डर आलेली आहे. आपण काही कर्मचाऱ्यांना कामावर घेतले पण हे त्यावेळेसच रिटायर्ड झाले आहेत. आता त्यांना आधी आपल्याला कामावर घ्यावे लागेल ना पण ते रिटायर्ड झाले आहेत. त्यांची आर्डर ही झालेली आहे. मग त्यांचे पेमेंटचं काय आणि त्यांची ऑर्डरही झालेली आहे उपायुक्त साहेबांकडे त्यांच फाईल आहे स्थायीत येऊन नाही राहिला अजुन असेपण कर्मचारी आहे जे रिटायर्ड झालेले आहे आपणच ठराव केलेला आहे. शासनाकडुन मार्गदर्शन आलेल आहे सर्व आलेल आहे. काहींना परत घेतले मग यांना का नाही. स्थायी समितीत का येत नाही आहे त्यांच प्रकरण.

**मा.सभापती :-** प्रस्ताव कसा काय ठेवलेला आहे.

**श्री.सतिश शुक्ला, आस्थापना अधिक्षक :-** स्टँडींग कमिटीने ठराव केल्याप्रमाणे आपण प्रस्ताव ठेवलेला आहे.

**श्री.नितीन बरडे :-** घेतले ना बाकीच्यांना घेतलेल आहे ना. शासनाच्या आदेशा प्रमाणे घेतलेले आहे ना .

**श्री.सतिश शुक्ला, आस्थापना अधिक्षक :-** बडतर्फ करण्यात आलेल्या कर्मचारी जे सेवानिवृत्त झाले आहेत त्यांचा प्रस्ताव ठेवलेला आहे.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती महोदया, खाली दुकाने आहे भरपुर तर त्यांच्या मधल्या भिंती पाडायच्या परवानग्या घेतलेल्या आहे का आपण ? आणि पाडु शकतो का ?

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** आता पर्यंत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब, कमीत कमी ६०-७० दुकाने आहेत ज्यांची मधील भिंत पाडलेली आहे आणि पाडणे सुरुच आहे. आपली ऐवढी मोठी इमारत आहे त्याला धोका नाही होणार का ? आज किती पब्लिक तेथे वावरते. किती पब्लिक वावरते. आज आपली इमारत किती मोठी आहे. तुमच्या परवानगीनुसार होत आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, याच्या आधी किती लोकांनी भिंत तोडण्याची परवानग्या घेतलेल्या आहे याची माहिती सभागृहाला द्यावी.

**मा.सभापती :-** अशी परवानगी दिली जाते का ?

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** परवानगी दिली जात नाही.

**मा.सभापती :-** मग आता पर्यंत जे कामे झालेले असतील तर ते कामे कसे काय झाले ? प्रशासनाच इतक दुर्लक्ष कस काय ? आज जो काम सुरु आहे सन्मा.सदस्यांनी जे मुद्दा उपस्थित केला आहे. प्रशासनाकडे या कामाबद्दलची माहिती आहे का ?

**श्री.नरेंद्र चौधरी, किरकोळ वसुली विभाग :-** परवानगी आमच्याकडुन दिली जात नाही. हा विषय आमच्या विभागाशी संबंधीत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** तर कोणाशी संबंधीत आहे. साहेब इमारतीला धोका होणार नाही का ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आताच काही लोक कॉम्प्लेक्स तोडुन नविन दुकान बांधली जात आहे. आता मी साहेबांना सांगितले.

**मा.सभापती :-** हे बिना परवानगीचे कामे ताबडतोब थांबवायचे.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती महोदया, समजा एखादा कॉलम तोडला मजुरांनी, काही झाली घटना, काय करणार आहे तुम्ही.

**मा.सभापती :-** ताबडतोब तपासणी करा आणि त्यांच्यावर आजच्या आज कार्यवाही सुरु करा.

**श्री.नितीन बरडे :-** ६०-७० दुकानांनी मधल्या भिंत तोडलेले आहे. एकाने ही कॉलम तोडला तर आपली ऐवढी मोठी ईमारतच काय ? नगररचना विभागाला काही नाही का याच्यातल. त्या ठिकाणी कार्यवाही करायला पाहिजे ना. १००% कोणाच्या ना कोणाच्या सल्लेने होत आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नगररचना विभाग असेल किंवा त्या प्रभागाचा इंजिनिअर असेल. मार्केट ऐरिया मध्ये नेमुन दिलेले इंजिनिअरची ही जबाबदारी नाही का ? आता पर्यंत कोणी कृत्य करत असेल अस याच्यासाठी परवानगी घेतलेली आहे की नाही. छोट्या मोठया गोष्टींसाठी खुप अडविल जात. मग या गोष्टींसाठी का नाही.

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** बांधकाम विभागाकडुन आपल्याकडे प्रकरण येत काही बदल असेल तर पण अश्या प्रकारची परवानगी आता पर्यंत आलेली नाही. बांधकाम विभागाकडे हा विषय आहे.

**मा.सभापती :-** बांधकाम विभागाचे जो कोणीही असेल त्यांनी याची तपासणी करुन ताबडतोब त्यांच्यावर कार्यवाही करायची आहे.

**श्री.नितीन बरडे :-** तुमच्या बातम्या चमकत आहे रोज बातम्या चमकता ह्या. भोगवटादारांचा नगररचनावर दबाव काय आहे हे ? चार दिवस झाले बंद करुन ठेवलेले आहे ते नगररचना विभाग. परवाचे सी.सी.टी.व्ही. फुटेज मी स्वत: माझ्या प्रकरणासाठी फिरत आहे. तिथले कॅमेरे बघा मी आहे की नाही तेथे बसलेला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** धामणे साहेबच नाही तेथे.

**श्री.नितीन बरडे :-** धामणे साहेब का नाही आहे तेथे. का नाही. कोणीही बाहेरचे येऊन तुम्हाला दमबाजी करतील. रजिष्टर पळवतील. आहो, धामणे साहेब येत नव्हते म्हणुन आमच्या बंटी जोशीने त्याच स्वत:च काम होत म्हणुन तुम्ही कुलुप लावल तर तुम्ही त्याच्यावर गुन्हे दाखल केले.

**मा.सभापती :-** नितीन भाऊ आता तुम्ही जे आरोप करत आहात तो अत्यंत चुकीचा आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मी त्यांना म्हणत आहे मॅडम कारण माझे काम थांबलेले आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अस काही घडलेल नाही. तुम्ही कसे म्हणत आहात.

**श्री.नितीन बरडे :-** मी पेपरातल्या बातमीच्या आधारे सांगत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पेपराच्या बातमी आधारे सांगत आहात तर पेपर वाल्यांना सांगा येथे कशाला सांगत आहात. साहेब यांना सांगा असे काही घडले आहे का तुमच्या विभागात.

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** पेपरवाल्यानी बातमी कशाच्या आधारे दिली ते मला माहिती नाही. ताईंना माहिती.

**श्री.सुनिल खडके :-** ताई तिथं गेलेल्या नाहीत.

**श्री.नितीन बरडे :-** ताई तिथे गेल्यापण नाही. ताईंचा विषयच नाहीये , ताईंचा कोणताचं विषय नाहीये . बाहेरचे कोणीतरी दम देवुन गेले तिथे तुमच्या कर्मचाऱ्यांनी सांगीतले आहे.

**श्री.सुनिल खडके :-** नितीन भाऊ काय आरोप करताहेत तुम्ही , चुकीचा आरोप करताहेत तुम्ही.

**श्री.चेतन सनकत :-** चुकीचे आरोप होताहेत नांव सांगा कोण आहे त्याचे ,नितीन भाऊ नावानिशी बोला मोघम बोलु नका.

**मा.सभापती :-** सन्मा सदस्यांनी , सगळया सदस्यांनी बसुन घ्यायचं आहे .

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपण मांडलेल्या विषयासंबंधी सभापती महोदयांनी आदेश दिलेले आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** गुन्हे दाखल केले होते ना त्यांनी , बंटी जोशीवर गुन्हा दाखल केला होता त्यांनी कुलुप लावले होते तेव्हा

**मा.सभापती :-** सभागृहाचा अपमान होतोय सर्व सन्मा सदस्यांनी , सगळया सदस्यांनी बसुन घ्यायचं आहे .अजेंडयावरील विषय संपल्यानंतर आपल्याला चर्चा करायची आहे , आढावा घेण्यात येईल.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती महोदय , आपण आढावा घेताहेत का ?

**मा.सभापती :-** यांच्याकडुन उत्तर घ्या , आणि सभागृहामध्ये चर्चा करा

**श्री.राजेंद्र पाटील :-** पण अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत ना.

**श्री.नितीन बरडे :-** कुठे दिले आहेत.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपण जे विषय मांडलेले आहेत त्याचे सभापतींनी आदेश दिलेले आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** आठ दिवस झाले काय चालु आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** धामणे साहेबांविषयी आम्ही काय बोलतोय.

**श्री.नितीन बरडे :-** हे पेपरमध्ये येत आहे ना .

**मा.सभापती :-** एक मिनिटं पेपरमध्ये आलं म्हणजे ते सगळं सत्य असता का नितीनभाऊ.

**श्री.नितीन बरडे :-** सत्य नसतं म्हणुन मी त्यांना विचारतो आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय जळगांव शहरात बरेच काही कामं चालु आहेत.यामध्ये काय होत लोक विकास करण्याच्या दृष्टीने , मंजुरीच्या दृष्टीने शहरात कामं करण्याचा प्रयत्न करताहेत , परंतु असं जर काही होत असेल तर आपण त्याकडे लक्ष घालुन तश्या मंजुरीला आळा बसणार नाही आणि आपल्या मनपाचे काम आहे की मनपाच्या मंजुरी कश्या मिळवुन देता येईल. नागरीकांचे कामे सोपे कसे करता येईल यासंदर्भात आपण निर्देश द्यावे.

**मा.सभापती :-** अधिकारी त्यांचे काम करतात , या सगळया नागरीकांचं समाधान झालं पाहीजे.

**श्री.नितीन बरडे :-** मी स्वत: फीरतोय.

**मा.सभापती :-** प्रकरणं थांबलेले नाहीयेत , २४ तारखेला मी स्वत: रजिष्टर पडताळणी साठी मागीतलेले होते आणि पदाधिकाऱ्यांना हा अधिकार आहे की आपण जर आपल्याकडे काही तक्रार येत असेल तर आपण त्या तक्रारीची शहानिशा करण्यासाठी संबंधित विभागाला बोलवु शकतो, त्यानुसार संबंधित विभागाला बोलावण्यात आलं , रजिष्टर पडताळणीसाठी मागवण्यात आले आणि कोणतही कामं तिथे थांबलेले नाही. कोणाला काही दमदाटी झालेली असेल संबंधित विभाग तक्रार करु शकतो .आत्ताच तिथे धामणे साहेब आलेले आहेत. आत्ताच मला सभा सुरू होण्यापुर्वी अशी माहिती मिळाली आहे की धामणे साहेब तिथे आलेले आहेत.आणि आज ते कामं सुरू करताहेत. मागच्या १५ दिवसांपासुन वारंवार माझ्याकडे तक्रारी येत होत्या की अनेकांची विनाकारण अडवणुक केली जाते आहे. त्यांच्या फाईलींचा निपटारा

होत नाहीये.आणि जर काही त्रुटी असतील काही अडचणी असतील तर त्या नुसार त्या होत नसतील त्याला काही हरकत नाही . फाईली थांबविण्याचा उद्देश हा होता दोन चार सहा महिन्यापासुन प्रकरण जर पेंडींग राहीले आणि चार दिवसांपुर्वी आलेल प्रकरण जर निपटारा होतो आहे तर हा भेदभाव का होतो आहे हे बघण पदाधिकारी म्हणुन माझी जबाबदारी आहे.आणि ती जबाबदारीचं ईथे पार पाडलेली आहे. आणि सत्ताधारी असतांना आपण, आपणचं आत्ता सांगीतलं की बंटी जोशींनी नगररचना विभागाला कुलुप ठोकलं होतं तर जर तिथं अंदाधुंद कारभार चालतं असेल व आपण ती कारवाई केली ती बरोबर होती तशीच जर आता आमच्याकडे काही तक्रार आली तर मी कारवाई केलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मान्य आहे , तुम्हाला ते अधिकार आहेत , तुम्ही जे कामं केलं ते योग्य केलं आम्ही त्याबद्दल काही म्हणतं नाहीये. पण पदाधिकारी सोडुन बाह्यशक्ती तिथे वावरते आहे.

**मा.सभापती :-** पदाधिकारी सोडुन जर कोणी बाह्यशक्ती तिथे वावरत असेल तर संबंधित विभागाने सांगावं.

**श्री.नितीन बरडे :-** तिथे अडकली आहे.

**मा.सभापती :-** संस्थांचे कामे आहेत सेवाभावी संस्थांचे काम आहे आणि तसे होवु नये सगळयांची कामं व्हावी सगळयांना भोगवटा प्रमाणपत्र मिळावं आणि त्यानंतर जर काही अडवणुक केली जातं असेल , नाकारली जातं असेल तर त्याच्यात लक्ष घालणं हे पदाधिकाऱ्यांचं कामं आहे. हीच माहिती आमच्याकडुन घेण्यात आलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** पदाधिकारी म्हणुन हा अधिकारं आपल्या सगळयांचा आहे तिथे जाण्याचा , बंटी जोशी पदाधिकारी होते तिथे अधिकारी येत नव्हते म्हणुन त्याने कुलुप ठोकलं होतं .

**मा.सभापती :-** आत्ता सुध्दा तिचं परिस्थिती आहे .

**श्री.नितीन बरडे :-** मग आता मला प्रशासनाने सांगाव की काय कारवाई करणार आहे .तिन दिवसांपासुन काय घडतय त्याच्यावर काय कारवाई करणार आहे त्याचं उत्तर द्यावं मला प्रशासनाने.

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** सांगा कोणाचा दबाव आहे का ?

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** धामणे साहेबांकडे जळगांव शहर महानगरपालिकेचा कारभार आहे. त्यानंतर टाऊनप्लानर ए.डी.टी.पी. संपुर्ण जिल्ह्याचा ही कारभार आहे. धामणे साहेब सोमवारी आणि मंगळवारी पाचोऱ्याला होते. आणि काल ते चोपड्याला होते आज सकाळी ते आलेले आहे. आज ऑफिस मध्ये बसलेले आहे.

**श्री.सुनिल खडके :-** कोणाचा दबाव आहे का ?

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** नाही, कोणाचा दबाव नाही.

**श्री.नितीन बरडे :-** मग तिन दिवसापासुन काम का होत नाही. तुमच्या अधिकारी कर्मचारींनी सांगितल सभापतीच काम नाही सांगितलेल आहे.

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** अस काही असेल तर मला याची सुचना नाही.

**श्री.नितीन बरडे :-** विचारा तुमच्या अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांना.

**श्री.ईस्माईल शेख, नगररचना विभाग :-** माहिती घेऊन सांगतो.

**श्री.नितीन बरडे :-** माझ्या फाईलवर नंबर लावायचा आहे. सी.सी. कॅमेरा चेक करा मी तिथे फिरत आहे की नाही.

**श्री.चेतन सनकत :-** ताई मला एक माहिती पाहिजे. मी दि.३०/११/२०१९ ला एक पत्र दिलेल आहे दवाखाने विभागाला ती माहिती आम्हाला आता पर्यंत मिळालेली नाही. त्याच्यानंतर मी दि.०९/१२/२०१९ ला पत्र दिल स्मरणपत्र तरी ही माहिती मिळालेली नाही. त्यानंतर दि.२३/१२/२०१९ ला स्मरणपत्र क्र.०२ अस पत्र दिल त्याच्या मध्ये उल्लेखपण केल होत की, ही माहिती मला स्थायी समिती सभेच्या आगोदर न मिळाल्यास संबंधीत अधिकाऱ्याला जबाबदार धरुन कार्यवाही करणेबाबत. तीन पत्र देऊन ही मला दावाखाना संबंधीत माहिती मिळाली नाही. लेखी पत्र दिलेल आहे तोंडी बोललो नाही.

**श्री.डॉ.रावलाणी :-** सन्मा.सभापती व सभागृह त्यांनी जी माहिती मागीतलेली आहे ते कागदपत्र काढणे सुरु आहे. दोन तीन दिवसात त्यांना ती माहिती देण्यात येईल.

**मा.सभापती :-** किती दिवस झाले पत्र देऊन तरी ही माहिती मिळत नाही.

**श्री.डॉ.रावलाणी :-** पहिल पत्र मला मिळालेल नाही. दुसरा आणि तिसरा मिळाला.

**श्री.चेतन सनकत :-** माहिती काय मागितलेली होती ती सांगा, जाऊ दया मी सांगतो. औषधींची मागणी दवाखाना निहाय संकलीत केलेली आहे काय ? सद्यास्थितीत औषधींचा साठा किती? नविन औषधी आठ महिन्यापासुन नाही झाली असे रुग्णांना सांगितले जाते. हे खरे आहे का ? औषधी खरेदीस ८ महिन्याचा विलंब झालेला असल्यास त्याच कारण काय ?

**श्री.डॉ.रावलाणी :-** औषधीची माहिती साठी प्रत्येक औषधीचा साठा किती आहे ते मागवाव लागत आहे. त्यासाठी मला माहिती देणेस वेळ लागत आहे.

**मा.सभापती :-** इतकी माहिती देण्यासाठी एका महिन्याचा कालावधी खुप झाला त्यांना. दोन स्मरणपत्र द्यावे लागले. तरी आपण उत्तर देत नाही.

**श्री.चेतन सनकत :-** सर आता किती दिवसात देणार माहिती.

**श्री.डॉ.रावलाणी :-** दोन तिन दिवसात देतो.

**श्री.चेतन सनकत :-** माझ्या माहिती नुसार सांगतो त्यांना लागणारी औषधींची मागणी मागविली जाते. हे खरे आहे का ? आता मी जो विषय सांगत आहे तो कोणत्या वर्षाचा विषय सुरु आहे.

**श्री.डॉ.रावलाणी :-** सन २०१९-२० चा.

**श्री.चेतन सनकत :-** आता आपण कोणत्या वर्षाची खरेदी करत आहोत सर.

**श्री.डॉ.रावलाणी :-** सन २०१९-२० ची करत आहोत.

**श्री.चेतन सनकत :-** सन २०१९-२० म्हणजे मार्च महिन्यात ते संपेल. बरोबर ना.

**श्री.डॉ.रावलाणी :-** हो.

**श्री.चेतन सनकत :-** म्हणजे या वर्षात एप्रिल महिन्यापासुन ३१ मार्च पर्यंत लागणारी औषधी साठा खरेदी आपण आता पर्यंत केलेली नाही. आठ महिन्यांचा जो विलंब झालेला आहे त्याला कारणीभुत कोण.

**श्री.डॉ.रावलाणी :-** सर ..

**श्री.चेतन सनकत :-** म्हणजे हे जे कामं करताहेत तुम्ही तिकडे त्याला कारणी भुत कोण.

**श्री.डॉ.रावलाणी :-** सर याच्या संदर्भात आयुक्त साहेबांच्या सुचनेनुसार आपण टेंडर प्रक्रीया करणार आहे .ते २ तारखेपर्यत पुर्ण होईल .

**श्री.चेतन सनकत :-** सर पहिले टेंडर केव्हा कॉल केले होते तुम्ही एप्रिल महिन्यात केले होते. दुसरे जुन महिन्यात केले होते. त्याच्यानंतर ४-५ महिने गॅप का गेला.

**श्री.डॉ.रावलाणी :-** आचार संहितामुळे विलंब झाला.

**श्री.चेतन सनकत :-** आचार संहिता संपायला दोन महिने झाले आपला विषय औषधी संदर्भात आहे. त्याची जाणीव घ्या. किती महत्वाचा विषय आहे.

**श्री.डॉ.रावलाणी :-** सर त्याला आपण दोन वेळा कॉल केले आहे आणि आपण मा.आयुक्त साहेबांच्या सुचनेनुसार तसेच आपण भांडारपाल यांच्याकडुन प्रसारीत केलेले आहे तरी ज्यांचे नियमात असेल तर त्याप्रमाणे काम त्यांना देण्यात येईल .

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य विभाग :-** आरोग्य जो विभाग आहे. त्यांला मी जॉईंट झाल्यानंतर तिसऱ्या चौथ्या दिवशी सरक्युलर किंवा कार्यालयीन आदेश काढलेला आहे. आपले सर्वात महत्वाचे काम आहे आपल्याकडे येणारा पत्र व्यवहार पुर्ण करुन देणे. अनेक वेळा अस होत की, साहेब मला हा मुद्दा तिन वेळा बोलले. माझे दोन किंवा तिन पत्र आहे. भंगाळे साहेबांनी ही मला त्यांचे पत्राची आठवण दिली आरोग्य विभागाबद्दल. विषय असा आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये मी एक परिपत्रक काढल होत. प्रत्येक लिपीकाने आपले कार्याबाबत रजिष्टर ठेवायला पाहिजे. प्रत्येक शुक्रवारी ते अपडेट केल पाहिजे. त्यांना गोषवारा द्यायला पाहिजे. दुसऱ्या महानगरपालिकेत पध्दत अशी आहे की, प्रत्येक शुक्रवारी कार्यालयीन रजिष्टर अपडेट केल्या शिवाय कधी ही राहत नाही. याच्या सर्वात महत्वाचा विषय असा आहे की, आलेल्या शासनाकडील इतर कार्यालयाचे असेल, सन्मा.आमदार, खासदार महोदयांचा असेल. महापालिकेतील पदाधिकाऱ्यांच असेल, नागरीकांचे असतील आणि इतर विभागांचे काही कम्प्लायन्स असतील. जर असे आपण वेळेवर केले तर असे विषय पेन्डींग राहणार नाही. आणि त्याच्यावर अनावश्यक खुप फॉलोअप घ्याव लागत.मागच्या आठवडयामध्ये त्याला परत एक रिमाईंडर कार्यालयीन आदेश आलेला आहे. त्या अनुषांगने विद्युत विभागाचे साळुंखे साहेब आहेत त्यांनी विद्युत विभागाला तशी सुचना दिलेली आहे.जे लिपीक , कर्मचारी वेळेत हे पुर्ण करणार नाही .त्यांना समज द्या , ताकीद द्या नसेल तर तुम्ही त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही सुध्दा प्रोसेस करा असे सुध्दा मी आदेशात म्हंटलेले आहे. औषध खरेदीचा विषय काही प्रमाणात त्याला विलंब झालेला आहे. नंतर मीच म्हंटल की विचारून ही बाब लवकर निपटुन जाईल तर मी मुलेप साहेब यांनी सुचविले की भांडार विभाग ते लवकर करू शकतं.तर आपल्याकडील उपलब्ध माहिती आजचं द्या आणि साठयाची माहिती दोन दिवसांत उपलब्ध करून दोन दिवसांत साहेबांना देवुन टाका .

**श्री.चेतन सनकत :-** साहेब या ठिकाणी एखादा गरजु माणुस येईल त्याला प्रायव्हेट हॉस्पीटल मध्ये जायला प्रॉब्लेम आहे, आर्थिक परिस्थिती खराब असेल असे लोक तिकडे येणार आहेत.आणि तुम्ही त्या लोकांची बददुवा घेताहेत.ते लक्षात ठेवा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सन्मा.सभापती व उपायुक्त साहेब मागचे नगरसेवकांचे मानधन बाकी आहे. तर नगरसेवकांचे मानधन काढण्यात यावे. जे पैसे जमा झालेले आहे त्यातुन तुम्ही नगरसेवकांना न विचारता, काही लोकांचे बिले दिलेले आहे. चांगले आहे पण आम्हाला विश्वासात घेवुन जर केल असत तर बरे झाले असते. तरी आजी माजी नगरसेवकांच ही मानधन काढण्यात याव. ही एक सुचना आहे.

**मा.सभापती :-** विभाग प्रमुखांनी त्यांची यादी तयार करावी व त्या यादी नुसार ज्यांना जास्त गरज आहे त्यांचे मानधन लवकर काढुन द्यावे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** माझ्या प्रभागातील कामाचं काय झाल , तिथे मटेरियल पण टाकुन ठेवले आहे.

**श्री.सोनगिरे, बांधकाम विभाग :-** जुना आसोदा रोड आपण डिपार्टमेंटली जेसीबी लावुन ते काम केले होते व पुर्ण केले होते आता पुन्हा आपल्याला जेसीबी व ट्रॅक्टरची उपलब्धता करावी लागेल .सध्या बांधकाम विभागाकडे जेसीबी एकच आहे तरी ते मध्यंतरी काही दिवस खराब झाले होते त्यामुळे ते बंद होते आता ते चालु आहे . आता सार्वजनिक शौचालय बांधकाम करायचे काम दिलेले आहे कॉन्ट्रक्टर ला ते कामं मुदतीत पुर्ण करायचे आहे म्हणुन आपण ते दोन तिन

दिवसांपासुन तिथे लावलेले होते. बरेच नगरसेवकांची प्रभागात जेसीबीची मागणी असते .त्यानुसार ते चालु आहे. दोन दिवसांत जर जेसीबी व ट्रॅक्टर जर मिळाले तर आपण ते काम दोन दिवसांत सुरू करून पुर्ण करून घेवु शकतो.

**श्री.प्रविण कोल्हे :-** साहेब आता बांधकाम विभागाचे जे ट्रॅक्टर आहे ना त्याच्यावरील माणसे व ते ट्रॅक्टर पण सुरू करा .

**श्री.सोनगिरे, बांधकाम विभाग :-** होय साहेब. त्या माणसांची मुदत संपल्यामुळे ती मुदत वाढवुन देण्यात येते आहे . त्याची रिपोर्टींग करून सोमवारी मा.आयुक्त साहेबांकडुन मंजुरी घेवुन त्याला मुदत वाढ देण्यात येईल.

**श्री.प्रविण कोल्हे :-** संकेत हॉस्पीटल जवळ चा रोड पण घ्या .

**श्री.सोनगिरे, बांधकाम विभाग :-** ठिक आहे .

**श्री. सुनिल खडके :-** जुन्या गावातील जुना खेडी रोड आणि स्मशानभुमिचा रोड कॉक्रींट चा आहे ना त्याला खुप खड्डे पडलेले आहे व तो खुप खराब झालेला आहे. खुप त्रास होतो तिथे .

**श्री.सोनगिरे, बांधकाम विभाग :-** तो रोड आपण कॉन्ट्रक्टर कडुन करणार आहे त्याचे काम देण्यात आले आहे. .

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**